तुती लागवड कार्यक्रम हा केवळ मंजूर
केलेल्या समूहांमध्येच राबविण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०१८/ प्र.क्र.३८
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: १४ मे, २०१८

<u>वाचा</u> :- १. शासन पत्र क्रमांकः रेशीम १०११/ प्र.क्र.३९/ रेशीम कक्ष दि. ६ ऑगस्ट, २०११.
२. शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण १३१५/ प्र.क्र.३०/ रेशीम कक्ष दि.१५ जुलै, २०१५.
३. शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण १३१५/ प्र.क्र.३०/ रेशीम कक्ष दि. २७ मार्च, २०१७.
४. संचालक (रेशीम), नागपूर यांचे पत्र कः रेशीम/ कार्या-८/नांदेड/उमरी समूह/प्रस्ताव/ १८/२१७७ दि. १५.०३.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

तुती लागवड कार्यक्रम राज्यातील २५ जिल्ह्यात महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

रेशीम उद्योगातील क्षेत्रीय कामकाजांचे सर्व पातळीवर संनियत्रण करण्यासाठी शासनाने ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत केली आहे. या प्रणालीमध्ये निश्चित केलेल्या तुती लागवड समुहांची माहिती भरण्याच्या सुचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांनी ११९ समुह व त्यातील गावांची माहिती भरलेली आहे. या माहितीस अनुसरून राज्यातील ११९ समुहामध्ये तुती लागवड कार्यक्रम राबविण्यास दिनांक २७ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि या निश्चित केलेल्या समुहांव्यतिरिक्त तुती लागवडीसाठी नविन समुहाची मागणी प्राप्त झाल्यास त्याचा स्वंतत्र प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना क्षेत्रीय कार्यालयास वर नमूद शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. रेशीम शेतीचा विस्तार व विकास परिणामकारक पध्दतीने होण्यासाठी तसेच राज्यामध्ये तुती लागवड ते कोषोत्तर प्रक्रिया उद्योगाचा एकात्मिक विकास करण्यासाठी समुह पध्दतीने तुती लागवड होणे आवश्यक आहे. यास अनूसरुन संचालक (रेशीम), यांनी त्यांच्या दिनांक १५.०३.२०१८च्या पत्रान्वये **प्रस्तावित केलेल्या उमरी, जिल्हा-नांदेड,** या समूहास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

रेशीम शेतीचा विस्तार व विकास परिणामकारक पध्दतीने होण्यासाठी तसेच राज्यामध्ये तुती लागवड ते कोषोत्तर प्रक्रिया उद्योगाचा एकात्मिक विकास करण्यासाठी समुह पध्दतीने तुती लागवड होणे आवश्यक आहे. यासाठी “रेशीम ऑनलाईन संनियंत्रण संगणक प्रणाली” कार्यरत आहे. या प्रणालीस शासन निर्णय दिनांक २७ मार्च, २०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या ११९ समुहाखेरीज आता नव्याने उमरी, जिल्हा - नांदेड, या समूहास मान्यता देण्यात येत आहे. राज्यात प्रस्तुत समुहाच्या समावेशानंतर आता एकूण समूहांची संख्या १२० झाली आहे. दिनांक २७ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे तुती लागवड व समूहविषयक मार्गदर्शक सुचना यापूढेही आहेत तश्याच लागू राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१४१५४९३३२३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashish
Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.05.14 15:48:10 +05'30'

(आ. अ. लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) / मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,
२. मा. अ.मु.सचिव (कृषि व पणन) मंत्रालय, मुंबई,
३. मा. सचिव (रोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
४. उपसचिव (कृषि) तथा सदस्य सचिव, राष्ट्रीय कृषि विकास योजना कक्ष, कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
५. मा. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१,
६. मा. आयुक्त, मनरेगा महाराष्ट्र राज्य, नागपूर,
७. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद,
८. जिल्हाधिकारी, नांदेड,
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड,
१०. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, विभागीय आयूक्त कार्यालय परिसर, नागपूर,
११. सहायक संचालक, प्रादेशीक रेशीम कार्यालय, औरंगाबाद,
१२. जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, नांदेड,
१३. रेशीम निवडनस्ती.